# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Political Science

## Assignment

## Session: 2017 – 2018

2017-2018

SEAL

नाव :- अपर्णा रविन्द्र गोंडाणे

कॉलेज नाव :- यशोदा गर्ल्स कॉलेज

वर्ग :- बी. ए. २ भाग - III

विषय :- राज्यशास्त्र

प्रकल्पाचे नाव :- भारतीय संविधानाचे वैशिष्ट्ये

2017-2018

Principal
Yashoda Girls Arts & Commerce
College, Sneh Nagar, Nagpur-15

# अहवाल

१) प्रस्तावना

२) लिखित व निर्मित संविधान

३) जगातिल सर्वात मोठे संविधान

४) लोकांचे सार्वभौमत्व

5) सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य

6) सार्वभौम

7) समाजवादी

८) धर्मनिरपेक्षता

९) लोकशाही

१०) संसदीय शासन

11) लवचिक व परिदृढ संविधान

१२) संसदेच्या साध्या बहुमताने
१३) संसदेच्या विशेष बहुमताने
१४) संसदेच्या विशेष आणि अर्ध्यापेक्षा जास्त घटक राज्यांच्या बहुमताने.
१५) एकेरी नागरिकत्व
१६) धर्मनिरपेक्ष राज्य
१७) मुलभुत अधिकार
१८) मुलभुत कर्तव्ये
१९) मार्गदर्शक तत्वे
२०) प्रौढ मताधिकार
२१) लोककल्याणकारी राज्य
२२) एकेरी न्यायव्यवस्था
२३) इतर देशातील चांगल्या गोष्टीचा स्वीकार

२५) संघराज्य पद्धती

२२) विश्वशांतीचे समर्थन

२३) न्यायालयाची स्वातंत्र्य

२४) न्यायिक पुनर्विलोकन

२६) दुहेरी शासन.

# प्रस्तावना

कोणत्याही देशाचे संविधान त्या देशाच्या राजकीय व्यवस्थेच्या आणि शासन प्रणालीच्या आधार असतो प्रत्येक देशाची परिस्थिती त्या देशाच्या शासन प्रणालीला प्रभावित असते त्यामुळे एका देशाच्या शासन संविधान दुसऱ्या देशाच्या संविधानापेक्षा भिन्न असते: अर्थात प्रत्येक देशाच्या संविधानाची आपली काही विशेष वैशिष्ट्ये असतात भारतीय संविधानाच्या विशेष वैशिष्ट्यांचा विचार खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

## १) लिखित व निर्मित संविधान

भारताचे संविधान लिखित निर्मित आहे संविधानाची निर्मिती घटना संविधानसभेकडून करण्यात आली आहे त्यात ३९५ कलमे २२ भाग आणि १२ परिशिष्टे आहेत संविधान सभेला त्याची निर्मिती करण्यासाठी २ वर्षे, ११ महिने व १८ दिवस लागले हे संविधान अधिक विस्तारपूर्वक लिहिण्यात आले आहे.

## २) जगातील सर्वात मोठे संविधान

भारताची राज्यघटना जगातील सर्वात मोठी व व्यापक राज्यघटना आहे. जगातील काही देशाच्या संविधानाचा विचार केल्यास त्या फार छोट्या आहेत उदा. अमेरिकेच्या संविधानात ७ कलमे, कॅनडाच्या संविधानात १४७ कलमे, ऑस्ट्रेलियाच्या संविधानात १२८ कलमे आणि दक्षिण आफ्रिकेच्या संविधानात १५३ कलमे आहेत भारताच्या संविधानात मात्र ३९५ कलमे. १२ परिशिष्टे आणि ती २२ विभागात विभागलेली आहे एवढेच नाही तर

१९५० पासून तर जानेवारी २००२ पर्यंत ९२ दुरुस्त्या झाल्या आहेत म्हणून जगातील विशाल संविधान हे भारताच्या संविधानाचे वैशिष्ट्य ठरते.

२) लोकांचे सार्वभौमत्व

भारतीय संविधान लोकांच्या सार्वभौम सत्तेवर आधारित आहे. अर्थात हे संविधान जनतेद्वारे निर्मित आणि स्वीकृत केलेले आहे संविधानाच्या उद्देशपत्रिकेत स्पष्टपणे लिहिले आहे. की " आम्ही भारतीय लोक ---- दृढ संकल्प करून आमच्या या संविधान-सभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी हे संविधान अंगिकृत अधिनियमीत आणि स्वतः प्रति अर्पित करीत आहोत " या संविधाना-द्वारे अंतिम सत्ता भारतीय जनतेला देण्यात आली आहे. विनिवडणुकीच्या माध्यमातून केंद्र सरकारला आणि राज्य सरकारांना जनतेकडून सत्ता प्राप्त होते. राज्याच्या कार्याला जनतेची इच्छा महत्वाची असते. हिच लोकांची सार्वभौमसत्ता असते.

5) सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत म्हटले आहे की, भारत एक सार्वभौम, समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही, गणराज्य आहे. याचे थोडक्यात स्पष्टीकरण पुढिलप्रमाणे आहे.

अ) सार्वभौम

सार्वभौमाच्या अर्थ असा की भारत अंतर्गत आणि बाह्य क्षेत्रात कोणत्याही सत्तेच्या नियंत्रणात नाही. अंतर्गत क्षेत्रात तसेच बाह्य क्षेत्रात भारत पुर्णपणे स्वतंत्र्य नियंत्रण भारतावर नाही.

ब) समाजवादी

समाजवादी हा शब्द 42 व्या घटनादुरुस्ती नुसार उद्देशपत्रिकेला जोडण्यात आला समाजवादी स्पष्ट व्याख्या न करता त्याला भारतीय परिस्थितीवर सोडण्यात आले आहे. उत्पादनाच्या साधनावर सरकारची नियंत्रण ठेऊन

सर्वांचे कल्याण करण्याचा विचार करण्यात आला आहे.

४) धर्मनिरपेक्ष

धर्मनिरपेक्ष हा शब्द मुद्दा ४२ व्या घटनादुरुस्तीनुसार उद्देशपत्रिकेला जोडण्यात आला आहे. या शब्दाचा अर्थ असा की राज्याच्या दृष्टीने सर्वधर्म समसमान आहेत. राज्य धार्मिक क्षेत्रात हस्तक्षेप करणार नाही. धर्म ही व्यक्तीची वैयक्तिक बाब आहे.

५) लोकशाही

जेथे शासन जनतेकडून किंवा त्यांच्या प्रतिनिधीकडून चालविले जाते ती लोकशाही होय. भारतात लोकांच्या प्रतिनिधीकडून शासन चालविले जाते. भारतात प्रौढ मताधिकार आणि लोकशाहीची स्थापना करण्यात आली

5] संसदीय शासन

भारतीय संसदीय शासन पद्धती स्वीकारण्यात आली आहे. भारतीय संसदीय शासन पद्धती-नुसार केंद्र व राज्य सरकारांच्या स्थापनेची व्यवस्था करण्यात आली आहे केंद्रात घटनात्मक प्रमुख असतात त्यांची सत्ता मंत्रिमंडळाजवळ असते. हे मंत्रिमंडळ आपल्या शासन कारभारा-साठी विधिमंडळाला जबाबदार असते. मंत्रिमंडळाचा कार्यकाल पुर्णत: विधिमंडळाच्या विश्वासावर अवलंबून असते.

6] लवचिक व परिदृढ संविधान

बदलत्या परिस्थितीनुसार समायोजन करण्याची क्षमता राज्यघटनेस असावी लागते. यासाठी राज्यघटनेत दुरुस्ती करण्याची व्यवस्था असणे आवश्यक असते. भारतीय राज्यघटनेच्या काही भागात साध्या व सोप्या पद्धतीने दुरुस्ती करता येते तर काही भागात दुरुस्ती करण्याची पद्धती कठीण व

गुंतागुंतीची आहे म्हणून लवचिकता व परिपूर्ण संविधान हे भारतीय संविधानाचे एक वैशिष्ट्य आहे. भारतीय संविधानात दुरुस्ती करण्याच्या खालील तीन पद्धती आहे.

अ) संसदेच्या साध्या बहुमताने

राज्यघटनेच्या काही भागात संसद साध्या बहुमताने दुरुस्ती करू शकते ही पद्धती साधारण कायदा बनविण्याच्या पद्धती सारखीच आहे. अर्थात उपस्थित सदस्यांच्या साध्या बहुमताने ही दुरुस्ती होऊ शकते. उदा. नवीन घटक राज्यांची निर्मिती वर्तमान राज्यांचे पुनर्गठन एखाद्या राज्याचा भाग दुसऱ्या राज्याला जोडणे भारतीय नागरिकत्वाच्या अधिनियमात परिवर्तन राज्यात विधानपरिषदेची निर्मिती किंवा समाप्ती संसद सदस्यांचे वेतन केंद्र शासित प्रदेश निर्माण करणे इत्यादी.

क) संसदेच्या विशेष आणि अर्ध्यापेक्षा जास्त घटक राज्यांच्या बहुमताने

राज्यघटनेच्या काही भागात दुरुस्ती करण्यासाठी संसदेच्या विशेष बहुमताबरोबर (२/३ बहुमताबरोबरच) अर्ध्यापेक्षा अधिक घटकराज्यांची मान्यता आवश्यक असते. उदा. राष्ट्रपतीची निवडणूक व निवडणूक पद्धती केंद्रीय कार्यकारी सत्तेचा विस्तार राज्यांच्या कार्यकारी सत्तेचा केंद्रशासित प्रदेशासाठी उच्च न्यायालय सर्वोच्च न्यायालय राज्यातील उच्च न्यायालये केंद्र व राज्यातील विधिविषयक संबंध विधिविषयक सत्तेचे विभाजन इत्यादी.

ही तिसरी पद्धती थोडी कठीण व गुंतागुंतीची आहे

अशाप्रकारे भारतीय संविधानाच्या काही भागात साध्या पद्धतीने व काही भागात विशेष पद्धतीने (कठीण पद्धतीने) दुरुस्ती केली जाते. म्हणून अंशतः लवचिक व अंशतः परिदृढ हे भारतीय संविधानाचे वैशिष्ट्य आहे.

## ८) धर्मनिरपेक्ष राज्य

घटनाकारांनी भारताला पूर्ण लोकतांत्रिक बनविण्यासाठी धर्मनिरपेक्ष सिद्धांताचा स्वीकार केला. धर्मनिरपेक्षतेच्या अंतर्गत प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या इच्छेनुसार कोणत्याही धर्म स्वीकार करण्याचा त्या धर्मानुसार आचरण विश्वास श्रद्धा व उपासना करण्याचा आणि त्याच्या शांततेच्या मार्गाने प्रचार करण्याचा अधिकार प्राप्त होतो. धर्म ही व्यक्ती-व्यक्तिगत बाब मानली जाते त्यात राज्य हस्तक्षेप करीत नाही. धर्माचा समान आदर केला जातो. राज्याचा स्वतःचा कोणताही धर्म नसतो.

## ९) मुलभुत अधिकार

भारताच्या संविधानात मुलभुत अधिकारांचा समावेश संविधानाच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ मध्ये करण्यात आली आहे. मुळ राज्यघटनेत घटनाकारांनी सात मुलभुत अधिकारांचा उल्लेख केलेल्या होता ते म्हणजे

१) समतेचा अधिकार २) स्वातंत्र्याचा अधिकार ३) शोषणाविरुद्धचा अधिकार ४) धर्मस्वातंत्र्याचा अधिकार ५) संस्कृती व शिक्षणाचा अधिकार ६) संपत्तीचा आणि घटनात्मक उपायाचा अधिकार परंतु ४४ व्या घटनादुरुस्तीनुसार संपत्तीचा अधिकार मूलभूत अधिकारामधून कमी करण्यात आला आहे. आता तो मुक्त वैधानिक अधिकार ठरला आहे.

## १०) मूलभूत कर्तव्ये

भारताच्या मूळ राज्यघटनेत मूलभूत समावेश करण्यात आलेल्या नव्हता १९७६ मध्ये राज्यघटनेत करण्यात आलेल्या ४२ व्या घटनादुरुस्तीनुसार नागरिकांच्या १० मूलभूत कर्तव्यांचा समावेश राज्यघटनेत करण्यात आला आहे. या कर्तव्यांचा उद्देश समाजवाद धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय अखंडतेचे संरक्षण करणे हा आहे. जसे राज्य घटनेचे पालन करणे राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करणे, राष्ट्राच्या सेवेसाठी तयार असणे, सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे इत्यादी.

SEAL

## ११] मार्गदर्शक तत्वे

राज्यघटनेच्या चौथ्या भागात कलम ३६ ते ५१ मध्ये मार्गदर्शक तत्वांच्या समावेश केलेला आहे हि मार्गदर्शक तत्वे आयर्लंडच्या राज्यघटनेमधून स्वीकारण्यात आली आहेत. या मार्गदर्शक तत्वांच्या माध्यमातून देशात कल्याणकारी राज्याची स्थापना करण्याचा प्रयत्न झालेला आहे. कायदे निर्मिती करतांना या मार्गदर्शक तत्वांना व्यवहारात आणणे ही केंद्र व राज्य सरकारांची नैतिक जबाबदारी आहे त्यांना मूलभूत अधिकारांसारखे न्यायालयीन संरक्षण नसले तरी कोणतेही सरकार या मार्गदर्शक तत्वाकडे दुर्लक्ष करु शकत नाही.

१३) प्रौढ मताधिकार

भारताच्या राज्यघटनेनुसार प्रत्येक प्रौढ भारतीय नागरिकांना कोणत्याहि भेदभावाशिवाय मतदानाच्या अधिकार देण्यात आला आहे. त्यामुळे राज्य - घटनेत वयाची २१ वर्षे पूर्ण करणाऱ्या व संसदेने सांगितलेल्या पात्रता पूर्ण केलेल्या सर्व भारतीय नागरिकांना मतदानाच्या अधिकार देण्यात आला होता परंतु ६१ व्या घटना दुरुस्ती - नुसार ही वयोमर्यादा २१ वर्षांवरून कमी १८ वर्षे करण्यात आली आहे.

१४) लोककल्याणकारी राज्य

घटनाकारांचे मुख्य उद्दीष्ट भारतात कल्याणकारी राज्याची स्थापना करणे हे होते. त्या उद्दिष्टाच्या पुर्तीसाठी त्यांनी संविधानाच्या प्रस्तावनेत (उद्देश पत्रिकेत) संविधानाचे आदर्श स्पष्ट केले. प्रस्तावनेत म्हटले आहे की सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय, न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, धर्म आणि उपासनेचे स्वातंत्र्य तसेच प्रतिष्ठा

व संधीची समानता राहील मुलभूत अधिकाराद्वारे सामाजिक व राजकिय भेदभावाना समाप्त करण्यात आले. नागरिकांना शिक्षण संस्कृती धर्म आणि व्यक्तिगत स्वातंत्र्य प्रदान करण्यात आले मागासवर्गीय तसेच अल्पसंख्यांक जातींची सुरक्षा सहाय्यता व संरक्षणाची विशेष व्यवस्था संविधानात करण्यात आली आहे.

## 14) एकेरी न्यायव्यवस्था

भारतात संघराज्य पध्दती स्वीकारण्यात आली असली तरी येथे अमेरिकेसारखी दुहेरी न्याय व्यवस्था नाही अमेरिकेत केंद्र सरकारची व राज्य सरकाराची स्वतंत्र न्यायालये आहेत केंद्रीय न्यायालये राज्याच्या न्यायालयांच्या कारभारात हस्तक्षेप करीत नाहीत भारतात मात्र एकेरी न्यायव्यवस्था आहे. भारतात शिरोभागी सर्वोच्च न्यायालय आहे त्यांच्या नियंत्रणाखाली राज्यातील उच्च व दुय्यम व जिल्हा न्यायालये आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या

निर्णय विश्लेषणात जाईल असा निर्णय देशातील कोणत्याही न्यायालयाला देता येत नाही.

15) इतर देशातील चांगल्या गोष्टींचा स्वीकार

भारताच्या घटनाकारांनी जगातील अनेक देशांच्या संविधानाचा अभ्यास करून ज्या ज्या चांगल्या गोष्टी इतर देशांच्या संविधानात दिसल्या त्या त्या आपल्या संविधानात समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. उदा: इंग्लंडमधून संसदीय शासन पद्धती, अमेरिकेकडून मूलभूत अधिकार आयर्लंडकडून मार्गदर्शक तत्वे केंद्रसूची राज्यसूची व समवर्ती सूची ऑस्ट्रेलियाकडून, संघराज्य पद्धती अमेरिकेकडून इत्यादी.

16) संघराज्य पद्धती

भारताच्या राज्यघटनेत संघराज्य federation हा शब्द प्रयोग वापरण्यात आलेला नाही.

त्यामुळेच राज्यांचा संघ असा union of states शब्द वापरण्यात आला आहे. परंतु लिखित राज्यघटना, अधिकार विभागणी सर्वोच्च न्यायालय ही जी संघराज्याची वैशिष्ट्ये असतात ती सर्व भारतात आढळून येतात म्हणून भारत हे संघराज्य आहे असे. हमखासपणे म्हणता येते.

## 17) विश्वशांतीचे समर्थन

'वसुधैव कुटुंबकम' या सिद्धांताचा स्वीकार करून भारतीय संविधानाने विश्वशांतीचे समर्थन केले आहे. मार्गदर्शक तत्वामध्ये कलम 51 नुसार आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा तसेच राष्ट्रामध्ये न्यायपूर्ण व सन्मानपूर्वक संबंध प्रस्थापित करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. भारताने नेहमीच आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन करून जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी होत असलेल्या प्रयत्नांना आपले समर्थन दिले आहे.

17) न्यायालयाचे स्वातंत्र्य

भारताच्या राज्यघटनेने न्यायालयाला स्वतंत्र दर्जा दिला असून न्यायालयाचे स्वातंत्र्य कायम राहावे. यासाठी काही तरतुदी राज्यघटनेत करण्यात आल्या आहेत न्यायाधिशांवर कोणतेही दडपण येऊ नये व त्यांना निःपक्षपातीपणे व निर्भिडपणे न्यायदान करता यावे म्हणून कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाच्या नियंत्रणापासून मुक्त व स्वतंत्र ठेवण्यात आले आहे. न्यायालयाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी पात्रता व सेवानिवृत्तीचे वय संविधानाने ठरवून दिले आहे त्यांना पदावरून करण्यासाठी महाभियोगासारख्या कठीण पद्धतीचा अवलंब. त्यांना नियमित वेतनाची तरतुद नुकसान होईल अशाप्रकारे यांचे वेतन कमी करता येणार नाही. त्यांची बदनामी होईल असे सार्वजनिक वक्तव्य कोणालाही करता येणार नाही इत्यादी.

18) न्यायिक पुनर्विलोकन

भारतीय संविधानात न्यायलयाच्या

स्वातंत्र्याबरोबर सर्वोच्च न्यायालयाला न्यायिक पुनर्विलोकनाच्या ~~सर्वोच्च~~ ~~न्यायाल~~ अधिकार देण्यात आला आहे. या अधिकारानुसार संसदेने केलेले कायदे किंवा राज्य विधिमंडळांनी केलेले कायदे जर राज्य घटनेच्या विरुद्ध असेल तर ते अवैध घोषित करून रद्द करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे.

## २०) दुहेरी शासन

संविधानाने केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यात अधिकाराचे विभाजन केलेले आहे. त्यासाठी केंद्रसूची समाविष्ट असलेल्या विषयावर शासन कारभार केंद्र सरकार चालवित असते. राज्यसूचित समाविष्ट असलेल्या विषयासंबंधी शासनकारभार राज्यसरकार चालवित असतात तर समवर्ती सूचित समाविष्ट असलेल्या विषयांवर दोन्ही सरकारे कायदे करू शकतात.

अशा प्रकारे भारताच्या संविधानात करण्यात आलेल्या महत्वपूर्ण ~~तरतु~~ तरतूदींच्या विचार, वैशिष्ट्यांच्या रूपाने करता येतो.

SEAL

Principal
(Sahodra) Girls Arts & Commerce
College, Sneh Nagar, Nagpur-15

(Sharad Sambare)
2017-2018